दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक ९८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.२ जुलै २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# सर्वांसाठी घरे या सिडकोच्या ध्येयाची वचनपूर्ती : ना.एकनाथ शिंदे

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

सिडको महामंडळातर्फे बांधण्यात आलेली ही घरे आजूबाजूच्या परिसरातील घरांच्या किंमतीशी तुलना करता अतिशय परवडणाऱ्या दरात उपलब्ध आहेत ही उल्लेखनीय बाब आहे. अतिशय उत्तम बांधकाम दर्जा असेलली ही घरे सर्वसामान्यांचा सिडकोवरील विश्वासास अधिक बळकटी देतात. या गृहनिर्माण योजनेस केंद्र सरकारकडून लागू असलेल्या अनुदानाचा भार सिडको महामंडळाने उचलला आहे. १ जुलैपासून घराचा ताबा देण्याचे वचन सिडकोने पाळले आहे. असे उद्गार एकनाथ शिंदे, मंत्री, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) तथा पालकमंत्री, ठाणे जिल्हा यांनी काढले. सिडको महामंडळाच्या २०१८-१९ महागृहनिर्माण योजनेतील कळंबोली येथील गृहनिर्माण योजनेच्या साईट व्हिजीट प्रसंगी त्यांनी हे उद्गार काढले. यावेळी एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यशस्वी अर्जदारांना सदनिका सुपूर्द करण्यात आल्या.





या साईट व्हिजिटला राजन विचारे, खासदार, ठाणे, डॉ.संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांची प्रमुख उपस्थिती तर अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको उपस्थित होते.

या साईट व्हिजिट दरम्यान एकनाथ शिंदे यांनी हजारो कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न साकार होत आहे, ही आनंदाची बाब असून कोविड-१९ च्या काळातही सिडकोतील अभियंते व अधिकाऱ्यांनी घरांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्याकडे लक्ष पुरविले. केवळ घर बांधणी व विकास प्रकल्प यात मर्यादित न राहता सिडकोने कोविड काळाच्या संकट समयी शासनाच्या निर्देशानुसार विविध ठिकाणी कोविड सेंटर व रूग्णालयाची उभारणी केली हे कौतुकास्पद आहे असे प्रशंसोद्गार काढले.

या वेळी डॉ. संजय मुखर्जी यांनी कोविड-१९ महासाथीच्या काळात उद्भवलेल्या अडचणींवर केलेली मात तसेच अर्जदारांना भेडसावणाऱ्या आर्थिक अडचणींचा सहानुभूतीपूर्वक विचार करून अर्जदारांना दिलासा देणारे निर्णय घेतल्याचा उल्लेख केला. यशस्वी अर्जदारांना सदनिका सुपूर्द करण्याचा हा क्षण वचनपूर्तीचा आनंद देणारा आहे. आजपासून यशस्वी अर्जदारांना घरांचा ताबा टप्याटप्याने देण्यात येईल असेही ते म्हणाले.

सिडकोतर्फे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सन २०१८-१९ मध्ये १४,८३८ घरांची योजना सुरू करण्यात आली. सदर योजने अंतर्गत नवी मुंबईतील घणसोली, खारघर, कळंबोली, तळोजा आणि द्रोणागिरी या ५ नोड्मध्ये ११ ठिकाणी घरे साकारण्यात आली. १४,८३८ घरांपैकी ५,२६२ घरे आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकासाठी तर ९,५७६ घरे अल्प उत्पन्न गटासाठी उपलब्ध करून देण्यात आली होती. ही घरे १ बीएचके (१ हॉल, १ खोली, १ स्वयंपाकघर, २ स्वच्छतागृहे) प्रकारातील असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी उपलब्ध असलेल्या घराचा चटई क्षेत्र २५.८१ चौ.मी. तर अल्प उत्पन्न गटाकरिता असलेल्या घराचा चटई क्षेत्र २९.८२ चौ.मी. इतका आहे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी तळोजा येथे २,८६२, खारघर येथे ६८४, कळंबोली येथे ३२४, घणसोली येथे ५२८ आणि द्रोणागिरी येथे ८६४ घरे उपलब्ध करून देण्यात आली होती. अल्प उत्पन्न गटासाठी तळोजा येथे ५,२३२, खारघर येथे १,२६०, कळंबोली येथे ५८२, घणसोली येथे ९५४ आणि द्रोणागिरी येथे १,५४८ घरे उपलब्ध करून देण्यात आली. या योजनेतील गृहसंकुलांना भारती शास्त्रीय संगीतातील रागांची नावे देण्याची अभिनव कल्पनाही राबविण्यात आली. सदर योजनेची संगणकीय सोडत दिनांक २ ऑक्टोबर २०१८ रोजी यशस्वीरीत्या पार पडली.

## संक्षिप्त...

### अजित पवारांच्या नातेवाईकांच्या साखर कारखान्यावर जप्ती

**दै.रायगड नगरी । मुंबई**

महाराष्ट्र राज्य सहकार बँक घोटाळ्याप्रकरणात ईडीने मोठी कारवाई केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नातेवाईकांचा साखर कारखाना जप्त करण्यात आला आहे. अजित पवारांचे मामा राजेंद्र कुमार घाडगे यांच्या साताऱ्यातील जरंडेश्वर कारखान्यावर जप्तीची कारवाई करण्यात आली. जरंडेश्वर साखर कारखाना पूर्वी सहकारी कारखाना होता. मात्र, महाराष्ट्र सहकारी बँकेचं कर्ज फेडू न शकल्याने त्या कारखान्याचा लिलाव करण्यात आला. नंतर तो कारखाना खाजगीरित्या विकत घेतला गेला आला. अजित पवारांचे निकटवर्तीय हा कारखाना चालवत होते.

साताऱ्यातील जरंडेश्वर साखर कारखान्यांच्या मालकांनी महाराष्ट्र राज्य सहकार बँकेकडून कर्ज घेऊन ते नंतर बुडवलं. नंतर त्या साखर कारखान्याचा लिलाव करण्यात आला. या साखर कारखान्याची कमी भावात विक्री झाली आहे. याबाबत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुंबई हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. त्यानुसार मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्याच्या अनुषंगाने ईडीने आपला गुन्हा दाखल केला आहे. त्याअनुषंगाने ईडीने केलेली ही मोठी कारवाई आहे.अजित पवारांच्या निकटवर्तीयांपर्यंत ईडी पोहचली असल्याने पवारांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

## एक्सप्रेस वे वर भीषण अपघात ; तिघांचा जागीच मृत्यू

**दै.रायगड नगरी । खोपोली**



गुरुवार दुपारी चार वाजण्याच्या सुमारास मुंबई - पुणे एक्सप्रेस वे किमी ३७ आडोशी उतारावर चार वाहनात भीषण अपघात घडला. यात एक कार पूर्णपणे जळून खाक झाली व या कार मधील तिघांचा होरपळून जागेवर मृत्यू झाला. यात आई वडील व तरुण मुलाचा समावेश आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, एक्सप्रेस वरील आडोशी तीव्र उतारावर कंटेनर ने आय टेन कार ला जोरदार धडक दिली ती कार पुढील पुढील ट्रक वर धडकली व कार ने पेट घेतला. दरम्यान त्याच कंटेनरने पुढील अजून एका कारला धडक देऊन अनियंत्रित होऊन रस्त्याखाली जाऊन उलटला. यात आय टेन कार जळून पूर्णपणे खाक झाली व यात लुईझा चितीयार (३५), झोकींम चितीयार (३४), धायरल चितीयार (४) या तिघा जणांचा होरपळून त्यांचा मृत्यू अपघात स्थळीच मृत्यू झाला. तर अपघात केला त्या कंटेनर चा चालक ही गंभीर जखमी झाल्याने त्याला एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले आहे.

या भीषण अपघाताची माहिती होताच खोपोली पोलीस, एक्सप्रेस वरील बोरघाट व पळस्पे क्षेत्र वाहतूक पोलीस, आपत्कालीन यंत्रणा, डेल्टा फोर्स यांनी तातडीने मदत कार्य करून, मृत व्यक्तींना वाहना बाहेर काढले. जखमींना तातडीने उपचारासाठी रवाना करण्याची कामगिरी बजावली. तसेच महामार्ग वरील अपघात ग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक ससामान्य केली. हे सर्व करतांना दीड तास लागला.

दरम्यान गुरुवारी दुपारीच पाली फाटा येथे अपघात घडला होता. यात ट्रक खाली येऊन येथील खासगी कंपनीत कार्यरत असलेल्या सुरक्षा रक्षक कर्मचारी किरण उतेकर याचा मृत्यू झाला. ही घटना बाबत पंचनामा सुरू असतानाच एक्सप्रेस वर दुसरा भयानक अपघात घडला. अशा प्रकारे खोपोली हद्दीत गुरुवारी अपघातात एकूण चार जणांचा मृत्यू झाला.

## जमिनीचे पैसे परस्पर लाटले; १८ लाखांची फसवणूक

**दै.रायगड नगरी । माणगाव**

बँक पासबुक तसेच अंगठे घेतलेले चेकबुक स्वतःकडे ठेवून जमिनीचे आलेले १८ लाख ४० हजार रुपये परस्पर लाटून महिलेची फसवणूक केल्याचा प्रकार माणगावमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी सदर महिलेच्या तक्रारीनंतर माणगाव पोलीस ठाण्यात तिघांविरोधात फसवणुकीसह अॅट्रॉसिटी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची घटना १५ सप्टेंबर २०२० रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास माणगाव तालुक्यातील विळे वरची वाडी गावाच्या हद्दीत घडली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर, या महिलेने पोलीस ठाण्यात धाव घेऊन ३० जून रोजी माणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

गुन्हा दाखल झालेल्या तिघांपैकी एकाने फिर्यादी महिलेच्या येलवडे येथील गाव हद्दीतील वडिलोपार्जित जमिनीचा आलेला १८ लाख ४० हजार रुपयांचा मोबदला मिळवून देण्याच्या बहाण्याने तिचे बँक पासबुक तसेच अंगठे घेतलेले चेकबुक स्वतःकडे ठेवून घेतले. नंतर त्याद्वारे फिर्यादीस शासनाकडून येणारी १८ लाख ४० हजार रुपयांची रक्कम तिच्या .../२

गोरेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या

## सुधारीत आराखडा मान्यतेबाबत त्वरीत कार्यवाही करा : ना. धनंजय मुंडे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक माणगांव तालुक्यातील गोरेगांव येथे उभारण्याबाबत सुधारीत आराखडा समाज कल्याण आयुक्तालयाच्या मान्यतेसाठी सादर करावा व स्मारक उभारण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी, असे निर्देश सामाजिक न्यायमंत्री ना.धनंजय मुंडे यांनी दिले.

रायगड जिल्हयातील गोरेगांव ता.माणगांव येथील पंचशील बौध्दजन सेवा संघ, या स्वयंसेवी संस्थेमार्फत स्मारक उभारणे व विविध लोकोउपयोगी उपक्रमाबाबत आयोजित करण्यांत .../२

## अक्कादेवी बंधाऱ्याला गळती चिरनेर गावातील रहिवाशांच्या जीवितास धोका

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**



चिरनेर या स्थानिक ग्रामपंचायत, उरण पंचायत समिती आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या उदासिन धोरणामुळे चिरनेर परिसरातील निसर्गही उपेक्षित राहिला आहे. त्यात पर्यटकांना आकर्षित करणाऱ्या अक्कादेवी बंधाऱ्याला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने, पावसाळ्यात बंधारा फुटला तर पाण्याचा लोंढा चिरनेर गावात शिरुन रहिवाशांच्या जिवीतास, भातशेतीस धोका निर्माण करु शकतो अशी भिंती सध्या व्यक्त केली जात आहे.

नवीमुंबई व रायगड येथील पर्यटन स्थळांमध्ये चिरनेर या निसर्गाचे वरदान लाभलेल्या आणि हुतात्म्यांच्या बलीदानाने पवित्र झालेल्या भूमीचाही समावेश आहे. अशा हुतात्म्यांच्या बलीदानाने आणि महागणपती देवस्थानमुळे पावन झालेल्या चिरनेर या इतिहास प्रसिद्ध भूमीला अगन्य महत्व प्राप्त झाले आहे.परंतु या पवित्र भूमीचा आणि नैसर्गिक संपत्तीचे पर्यटन स्थळांमध्ये रुपांतर करण्याकडे शासन व प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. तरी आजही चिरनेरच्या डोंगररांगेत वड, साग, आंबा, जांभूळ, करवंद, रानकेळी, बिबळा सह इतर वृक्षसंपदेचा समावेश आहे. नाग, अजगर व इतर सरपटणारे साप, फुलपाखरे तसेच ससा, भेकर रानडुक्कर, मोर, रानमांजर, घोरपड, वानर व इतर अनेक प्राण्यांचाही जंगलात समावेश आहे.

अशा प्रकारे विविध प्रकारच्या पक्षी, प्राणी, वनसंपदेमुळे आणि पावसाळ्यात फेसाळून वाहणारा बंधारा पर्यटकांना आकर्षित करत असतो, त्यामुळे येथील निसर्गरम्य परिसराचा आनंद लुटण्यासाठी तसेच जागूत अशा .../२




## डॉक्टर दिनी पाबळ येथील संशयित बोगस डॉक्टर पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी/प्रदीप मोकल**

आजच्या जागतिक डॉक्टर दिनालाच पेण तालुक्यातील वडखळ जवळील पाबळ येथून वडखळ पोलिसांनी एका संशयित बोगस डॉक्टरला ताब्यात घेतले आहे.

> श्री कृपा दवाखाना पाबळ येथे आज पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात आक्षेपार्ह औषधे, सिरीज आढळून आले. त्यांची डिग्री ही संशयास्पद असून संशयास्पद डॉक्टर एकनाथ मोकल यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर यांच्या अहवाला नंतर पुढील अटकेची कारवाई करण्यात येईल.
>
> **बाळा कुंभार, पोलीस निरीक्षक, वडखळ पोलीस स्टेशन**



वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी गुप्त बातमीदार मार्फत वडखळ जवळील पाबळ आदिवासी विभागात एक बोगस डॉक्टर कार्यरत असल्याची माहिती मिळाल्यावरून गुरुवारी ( ता.१) रोजी पाबळ येथे तालुका आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर यांच्या बरोबर उपनिरीक्षक मडके, हवालदार रुईकर, दिनेश भोईर, अमोल म्हात्रे, धाड टाकून संशयित बोगस डॉक्टर एकनाथ मोकल ( रा.आमटेम,ता.पेण) यांना चौकशी साठी ताब्यात घेतले. या बोगस डॉक्टर वर २०१३ मध्ये देखील अशाच प्रकारे पोलिसांनी कारवाई केली होती. मात्र त्या बाबतीत न्यायालयात केस सुरु असताना सुद्धा सदर डॉक्टर प्रॅक्टिस करत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांनी दिली.

# भूकमुक्तीच्या दिशेने

देशातील सर्व स्थलांतरित श्रमिकांना, ते जिथे आहेत तिथे, अन्नधान्य मिळावे यासाठी 'एक देश, एक रेशनकार्ड' ही योजना राबविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला आदेश देण्याची वेळ आली आहे. यापूर्वीही करोनारुग्णांना ऑक्सिजनचा पुरवठा करण्यापासून सर्व प्रौढांना मोफत लस देण्यापर्यंत अनेक बाबी होण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाला आदेश द्यावा लागला. आपले राजकीय पक्ष; सर्व सत्ताधारी सातत्याने कल्याणकारी राज्याची भाषा करीत असताना, प्रत्यक्षात त्याला पूरक अशी धोरणे राबविण्यासाठी न्यायालयांचा आदेश लागावा, ही दुर्दैवी बाब आहे. न्यायव्यवस्थेची सक्रियता स्वागतार्ह असली, तरी शासन व्यवस्था कर्तव्यांपासून दूर जात असल्याचे चित्र यातून अधोरेखित होते. ही स्थिती तातडीने बदलण्याची जबाबदारी अर्थातच केंद्र आणि राज्यांतील सत्ताधाऱ्यांची आहे. 'एक देश, एक रेशनकार्ड'बाबत अन्य मुद्दे किंवा तांत्रिक अडचणी उपस्थित करून न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी लांबणार नाही हे त्यांनी पाहायला हवे. न्यायालयाने दिलेल्या एक महिना मुदतीच्या आतच ही योजना कार्यान्वित करण्यासाठी पावले उचलायला हवीत. सुमारे ६९ कोटी स्थलांतरितांचा हा प्रश्न असून, त्यांच्यावर करोनाने नव्हे, तर भुकेने मरण्याची वेळ येणार नाही, यासाठी प्रशासनाने तातडी करायला हवी. आपले राज्य सोडून अन्यत्र स्थलांतरित झालेल्या श्रमिकांना त्यांच्या रेशनकार्डावर कसलीही अडचण न येता धान्य मिळण्यासाठी राष्ट्रीय वेब पोर्टल उभारण्यापासून सर्व तरतुदी व्हाव्यात. न्यायालयानेच म्हटल्याप्रमाणे आधीच 'अक्षम्य दिरंगाई' झाली आहे. आणखी दिरंगाई परवडणारी नाही. गेले दीड वर्ष संपूर्ण जग करोनाचा सामना करीत आहे. अलीकडे अशा जागतिक साथरोगाला सामोरे जाण्याची वेळ आलेली नसल्याने आणि देशातील आरोग्य व्यवस्था कमकुवत असल्याने त्याच्या हाताळणीत अनेक चुका झाल्या. अचानक लॉकडाउन जाहीर करण्यापासून आरोग्य यंत्रणा सुसज्ज न ठेवण्यापर्यंतच्या या चुकांची मोठी किंमत मोजावी लागत आहे. रुग्णसंख्या आणि मृत्यूसंख्या यांतून करोनाचे भयावह चित्र दिसत असले, तरी आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांवर झालेला परिणामही मोठा आहे. प्रदीर्घ लॉकडाउनमुळे लाखो लोकांचा रोजगार गेला; त्यांपैकी कित्येकांना पुन्हा नवा रोजगार मिळालेला नाही. बहुतेकांच्या वेतनात कपात झाली. करोनाची पहिली लाट ओसरल्यानंतर उद्योग आणि व्यवसाय पुन्हा सुरू होत असतानाच दुसरी लाट आली आणि पुन्हा टाळेबंदी झाली. हे निर्बंध अजूनही पूर्णपणे उठविण्यासारखी स्थिती नाही. शिवाय संभाव्य तिसऱ्या लाटेचा आणि 'डेल्टा प्लस' या करोनाच्या विषाणूच्या नव्या अवताराचा धोका आहे. अशावेळी गरिबांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे रास्त दरात धान्यपुरवठा केला जात असला, तरी स्थलांतरितांना त्याचा लाभ घेता येत नाही; कारण त्यांच्याकडील रेशनकार्ड अन्य राज्यांतील असते. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा होऊनही श्रमिकांवर उपासमारीची वेळ येणे खेदजनक आहे. ही स्थिती बदलण्यासाठी रेशनकार्ड देशभर वापरण्यायोगे करणे आवश्यक आहे. त्यासाठीच 'एक देश, एक रेशनकार्ड' ही योजना प्रत्यक्षात यावी. न्या. अशोक भूषण आणि न्या. एम. आर. शहा यांच्या खंडपीठाने याचा उल्लेख 'नागरिककेंद्री सुधारणा' असा केला असून, त्यासाठी ३१ जुलैपर्यंत मुदत दिली आहे. श्रमिकांच्या प्रश्नावरील याचिकेच्या निवाड्यात न्यायमूर्तीद्वयीने केलेल्या सूचना महत्त्वाच्या आहेत. साथरोगाच्या काळात सर्व राज्यांनी आणि केंद्रशासित प्रदेशांनी स्थलांतरित श्रमिकांसाठी सामुदायिक स्वयंपाकगृहे सुरू करावीत, केंद्राने पुरेसा धान्यपुरवठा करावा, श्रमिकांची नोंदणी करावी आदी सूचनांची अंमलबजावणी तर तातडीने व्हावी. तसेच, अन्नसुरक्षेचा मूलभूत अधिकार म्हणून राज्यघटनेत समावेश करण्याच्या सूचनेचा गांभीर्याने विचार व्हावा. जीविताच्या अधिकारात अन्नसुरक्षेचा समावेश करता येतो किंवा जीविताचा अधिकार याचा अर्थ अन्न मिळण्याचा अधिकार असाही लावता येऊ शकतो, हा निकालपत्रातील मुद्दा महत्त्वाचा आहे. अन्नधान्यात देशाने स्वयंपूर्ण होण्यासाठी गंभीर उपाययोजना केल्यानंतर हरित क्रांती साकारली. त्यापुढील टप्पा म्हणजे प्रत्येक नागरिकाला दोन वेळचे अन्न मिळणे हा आहे. ते न मिळाल्याने उपासमारीने मरण्याची वेळ एखाद्यावर येणे म्हणजे अन्नधान्यांची स्वयंपूर्णता निरर्थक ठरणे. ही बाब देशासाठी लांछनास्पद आहे. त्यामुळे देशातील प्रत्येकाला अन्न मिळेल, याची चोख व्यवस्था व्हावी. म्हणूनच अन्न सुरक्षा कायद्याच्या पुढे जात घटनात्मक तरतूद व्हावी. 'एक देश, एक रेशनकार्ड' हे त्या दिशेने जाणारे पुढचे पाऊल आहे. खरा उद्देश 'भूकमुक्त भारता'चा आहे आणि त्यासाठी सुसज्ज व्यवस्था उभारावी. समाजातील शेवटचा माणूस डोळ्यांसमोर ठेवण्याचा गांधीजींचा विचार यासाठी मार्गदर्शक आहे. प्रगतीची, पाच लाख कोटी डॉलर अर्थव्यवस्थेची आणि महासत्ता होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगताना देशात एकही भारतीय अर्धपोटी झोपणार नाही, हे पाहायलाच हवे.

# माथेरानमधील सामाजिक कार्याने झपाटलेले एकमेव असामान्य व्यक्तिमत्त्व जनार्दन पार्टे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

संघर्ष, कुचंबणा, होरपळ, अडीअडचणी, समस्या ह्या पूर्वीपासून माथेरान करांच्या पाचवीलाच पुजलेल्या आहेत. एखाद्या समस्येवर भाष्य करण्यासाठी आपण उगाच कशाला वाईटपणा घ्यायचा याच कारणास्तव कुणीही पुढे येत नाहीत. अनेकदा सर्वांना उद्भवणाऱ्या समस्यावर तोडगा काढण्यासाठी यातून काहीतरी मार्ग निघ-ावा यासाठी सहसातरी कुणीही पुढाकार घेत नाहीत.

ही इथली एकंदरीत वस्तुस्थिती आहे.दुसऱ्याचे होईल ते आपले होईल या भावनेने बहुतांश नागरिक मूग गिळून गप्प बसण्याची भूमिका बजावतात. परंतु या सर्व बाबीना तिलांजली देत समस्या मग ती कुठलीही असो रेल्वेच्या गलथान कारभारा बाबतीत असो, पाणी समस्या, बीएसएनएल अनियमित सेवेचा बोजवारा, विजेच्या नेहमीच्या लपंडावाची असो,मिनीबसच्या अपुऱ्या फेऱ्यामुळे नागरिकांना होत असलेल्या सेवे बाबत, जेष्ठ नागरिकांच्या न्याय हक्कासाठी शासन दरबारी पाठपुरावा असो अथवा पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याबाबत असो नेहमीच आपल्या शैक्षणिक गुणांचा वापर करून संबंधित



अधिकारी वर्गाशी पत्रव्यवहार करणे आणि जर का पत्रव्यवहार करून देखील काहीच ठोस माहिती उपलब्ध होत नसेल तर शासनाच्या माहितीच्या अधिकाराचा वापर करून अधिकारी वर्गाला सळो की पळो करून सोडणारे आणि निश्चितपणे प्रत्येक समस्येवर ठाम उपाययोजना करण्यासाठी एकप्रकारे सामाजिक बांधिलकीने आणि केवळ समाजाच्या उन्नतीसाठी, हितासाठी सामाजिक कार्याने झपाटलेले माथेरान मधील एकमेव म्हणजे अर्थातच येथील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे होय. प्रत्येक समस्या बाबतीत केलेल्या पाठपुराव्याच्या जनार्दन पार्टे यांच्या कडे फाईली भरलेल्या आहेत. माथेरान मधील नागरिकांना भेडसावत असणारी कुठलीही अशी बाब नाही की ज्यासाठी पार्टे यांनी शासन दरबारी पाठपुरावा केलेला नाही. एवढा पत्रप्रपंच करून सुध्दा एखादं वेळी आमदार, खासदार अथवा कुठल्याही पक्षाच्या मंत्र्यांनी माथेरानला भेट दिली तर आवर्जून त्यांना इथल्या समस्येवर उपाय योजना करण्यासाठी निवेदन देण्यासाठी त्यांचा हातखंडा आहे. गावाच्या अडीअडचणी बाबतीत सविस्तरपणे माहिती कथन करून आमच्या गावच्या समस्या त्वरीत मार्गी लावाव्यात यासाठी धडपड करणारे जनार्दन पार्टे हे मागील काळात एक सद्स्य समितीचे अध्यक्ष होते. पनवेल धोदानी मार्ग सुरू करावा जेणेकरून इथले पर्यटन अधिकाधिक बहरेल यासाठी सातत्याने पाठपुरावा करीत असून आजही ते या मागणीसाठी ठाम पाठपुरावा करीत आहेत. निस्वार्थपणाने कामे करताना त्यांना त्यांच्या पत्नी सुध्दा सहकार्य करीत असतात त्यामुळे ते आपल्या कामातून वेळात वेळ काढून गावाच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. कोणत्याही कामात यश मिळो न मिळो परंतु प्रयत्न करीत राहणे ह्या एकाच गुणधर्मामुळे ते तालुक्यात सुपरिचित आहेत.

# रिक्षासह मोटार सायकल चोरणाऱ्या सराईत अल्पवयीन मुलास पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरासह खारघर, कोपर खैरणे, एपीएमसी आदी परिसरात रिक्षासह मोटार सायकल चोरणार्या( सराईत अल्पवयीन मुलास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतल्याने त्याच्याकडून २ लाख १० हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



गेल्या काही दिवसापासून पनवेल परिसरात रिक्षासह मोटार सायकल चोरीस जाण्याचे प्रमाण वाढले होते. या संदर्भात वपोनि अजयकुमार लांडगे व पोनि ( गुन्हे) संजय जोशी यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि अनिल देवळे, पोउपनि सुनिल तारमळे, पोहवा रविंद्र राऊत, पोशी युवराज राऊत, पोशि सुनिल गर्दनमारे, पोशि विवेक पारासर, पोशि यादवराव घुले, पोना विनोद पाटील, पोना पंकज पवार, पोना गणेश चौधरी, पोशी खेडकर व पोशि साळुखे आदींचे पथक सदर व्यक्तीचा शोध घेत असताना पेट्रोलिंग करण्याच्या दरम्यान अभिलेखावरील विधीसंघर्ष बालक (१७ रा.लक्ष्मीनगर झोपडपट्टी) हा चोरीची ऑटो रिक्षा चालवत असल्याबाबत माहिती मिळाल्याने त्यास पनवेल बस डेपो येथून ताब्यात घेतले असता त्याच्याकडे पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १३४/२०२१ भादवि कलम ३७९ या गुन्ह्यातील चोरीला गेलेली ऑटो रिक्षा मिळून आली. त्याच्याकडे अधिक चौकशी करता त्याने कोपर खैराने, एपीएमसी व खारघर पोस्टे परिसरातून ऑटो रिक्षा तसेच मोटर सायकल चोरी केले बाबत कबुली दिली आहे. सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून आतापर्यंत २ लाख १० हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

# रायगड जिल्हा परिषदमध्ये हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक यांना अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते स्व.वसंतराव नाईक जयंतीनिमित्त रायगड जिल्हा परिषद मध्ये अभिवादन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष कु.योगिता पारधी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, माजी उपाध्यक्ष तथा जि.प. सदस्य आस्वाद पाटील, कृषी व पशुसंवर्धन सभापती बबन मनवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) डॉ.ज्ञानदा फणसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्रीमती उज्वला बाणखेले तसेच कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरकुटे, जिल्हा पशुधन विकास अधिकारी डॉ.बंकट आर्ले व इतर अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते.

कृषी दिनाचे औचित्य साधून रायगड जिल्हा परिषद कृषी विभागाने तयार केलेल्या कृषी विभाग योजना माहिती पत्रकाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री. जयवंत गायकवाड यांनी वृक्ष प्रतिज्ञा दिली. रायगड जिल्ह्यात आतापर्यंत अंदाजे एक लाख झाडे लावण्यात आली असून लवकरच एक लक्ष साठ हजार झाडे लावण्याचे उद्दिष्टपूर्ती करण्याचे नियोजन आहे.

कुंटेबाग येथे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष कु.योगिता पारधी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, माजी उपाध्यक्ष तथा जि.प. सदस्य आस्वाद पाटील, कृषी व पशुसंवर्धन सभापती बबन मनवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) डॉ.ज्ञानदा फणसे आदींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी उत्तम जाधव, अलिबाग गट विकास अधिकारी डॉ. दीप्ती देशमुख, राजेश घरत, डॉ. कैलाश चौलकर व कृषी विभागाचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# रोटरी ट्रस्ट चेअरमन सुधीर कांडपिळे यांचा सेवापूर्ती सत्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन चॅरिटेबल ट्रस्ट संचालित रोटरी कर्णबधिर मुलांच्या विशेष शाळेत संस्थेचे चेअरमन सुधीर कांडपिळे तसेच संस्थेचे सचिव राजेंद्र ठाकरे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.



यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष हर्मेश तन्ना पुढील अध्यक्ष गुरुदेवसिंग कोहली त्याचप्रमाणे चॅरिटेबल ट्रस्ट चेअरमन डॉ. जनार्दन एन. सी., नुतन सचिव सैफुद्दीन व्होरा, नुतन खजिनदार प्रमोद वालेकर तसेच कान, नाक, घसा तज्ञ डॉ. कांचन जनार्दन, रेखा कांडपिळे, शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका शैला बंदसोडे आणि सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मा. चेअरमन व मा. सचिव यांच्या सहकार्याने ६ वर्षाच्या कालावधीत शाळेची झा-लेली प्रगती, सोईसुविधा, शीघ्र निदान व उपचार केंद्राची स्थापना विद्यार्थ्यांसाठी ई-लर्निंग ची सुविधा, कॉम्प्युटर इ. अशा सर्व आधुनिक व तंत्रज्ञानाची सोय उपलब्ध करुन दिली. त्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले. शाळेतील शिक्षक कर्मचारी वर्गाने आपापले मनोगत व्यक्त केले. शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका शैला बंदसोडे यांच्या हस्ते चेअरमन सुधीर कांडपिळे यांचा व सचिव राजेंद्र ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ तसेच कोलाज फ्रेम देऊन त्यांना गौरवण्यात आले. याप्रसंगी नवनियुक्त चेअरमन डॉ. एन.सी. जनार्दन व सचिव सैफुद्दीन व्होरा यांचा शाल, श्रीफळ व भेटवस्तु देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विशेष शिक्षिका अरुंधती बंदसोडे यांनी उत्कृष्टरित्या केले. तसेच स्पीच थेरपिस्ट संजय होन यांनी आपले विचार व्यक्त केले.


## गहाळ झाले आहे

किनारा को.ऑप. हौसिंग सोसायटीचे सदस्य निता गणपत कल्याणकर यांच्या नावाने काढलेली शेअर्स सर्टीफिकेट क्रमांक ०९३ व शेअर क्रमांक ४६१ ते ४६५ हे गहाळ झाले आहेत. तरी ते कोणाला मिळाल्यास किनारा को.ऑप हौसिंग सोसायटी बावन बंगला पनवेल-४१०२०६ (रायगड) या पत्यावर आणून देणे.

**चेअरमन**
**किनारा को.ऑप.हौसिंग सोसायटी, पनवेल, जि.रायगड**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## जमिनीचे पैसे परस्पर लाटले; १८ लाखांची फसवणूक

खात्यावरून परस्पर काढून फिर्यादीची फसवणूक केली. सदर मोबदला मागण्याकरिता फिर्यादी महिला गेली असताना तिला जातीवाचक शिवीगाळ करुन, तुरुंगात टाकण्याची धमकी देण्यात आली. याप्रकरणी सदर महिलेच्या तक्रारीवरुन, माणगाव पोलीस ठाण्यात तिघांविरोधात भादवि संहिता कलम ४२०, ५०४, ३४ तसेच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ चे कलम ३(१)(आर), ३(१)(एस) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास माणगाव तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील हे करीत आहेत.

## सुधारीत आराखडा मान्यतेबाबत त्वरीत कार्यवाही करा : ना. धनंजय मुंडे

आलेल्या आढावा बैठकी दरम्यान श्री. मुंडे बोलत होते. यावेळी पर्यटन राज्यमंत्री तथा पालकमंत्री रायगड जिल्हा कु. आदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे उपस्थित होते.

श्रीवर्धन राज्य मार्गाला लागून असलेल्या मोजे गोरेगाव येथे पंचशील बौध्दजन सेवा संपाच्या जागेवर १९८५ मध्ये संस्थेची इमारत बांधण्यात आली. या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सभा घेतली होती. अशा या ऐतिहासिक ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारुन बहुउद्देशीय इमारत बांधण्याचा संस्थेचा संकल्प आहे. या बहुउददेशीय स्मारक व इमारतीसाठी नव्या आराखड्यानुसार निधी देण्यात येणार आहे. या बहुउददेशीय प्रकल्पातून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य घडेल, असा विश्वास ही पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सह सचिव दि. रा. डिगळे, अवर सचिव अतिरे, प्रादेशिक उपायुक्त, मुंबई विभाग श्रीमती वंदना कोचुरे, सहाय्यक आयुक्त, रायगड सुनिल जाधव, पंचशील बौध्दजन सेवा संघाचे अध्यक्ष विकास गायकवाड, सचिव संदिप साळवी इ. मान्यवर उपस्थित होते.

## अक्कादेवी बंधाऱ्याला गळती चिरनेर गावातील रहिवाशांच्या जीवितास धोका

महागणपती देवस्थान चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यासाठी लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी वर्गा बरोबर हजारो भाविक, देशभक्त, निसर्ग अभ्यासक, पर्यटक आप आपल्या कुटुंबासह वर्षभर या परिसराला भेटी देत असतात. परंतु स्थानिक ग्रामपंचायत, उरण पंचायत समिती आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या भ्रष्ट कारभारामुळे आणि शासकीय अनास्थेमुळे हा परिसर उपेक्षित राहिला आहे. त्यात सध्या पावसाळ्यात अक्कादेवी बंधाऱ्याला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने बंधारा फुटला तर पाण्याचा लोंढा चिरनेर गावात शिरुन रहिवाशांच्या जिवीतास भातशेतीस धोका निर्माण करू शकतो. अशी भिंती शेतकरी, निसर्ग प्रेमी, पर्यटक व्यक्त करत आहेत.


## जाहिरनामा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प उरण**
**अंगणवाडी सेविका पदभरती -२०२१**

जा.क्र.एबाविसेयो/आस्था/अं.भ्./१६३/२०२१ जाहिरात क्र.०३/२०२१

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. एबावि-२०१२/प्र.क्र.४२९/का.०६ दि, १३ ऑगस्ट, २०१४ अन्वये उरण प्रकल्पांतर्गत अंगणवाडी सेविका ६ (सहा) पदे भरावयाची आहेत. त्याकरीता सबंधीत गावातीलच (ग्रामपंचायत नव्हे) ज्या गावात अंगणवाडी केंद्र आहे अशा गाव-ातील स्थानिक महिला उमेदवारांकडून जाहिराती मधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पद्धतीने कार्यालयीन वेळेत दिनांक ०५/०७/२०२१ ते १६/०७/२०२१ पर्यंत अर्ज कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहेत. याकरिता उमेदवारचे वय दिनांक १/०७/२०२१ ला अनुसरुन २१ वर्षे पुर्ण करणारे व ३२ वर्षाच्या आतील असणे आवश्यक आहे. अंगणवाडी सेविका या पदासाठी किमान दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

**अंगणवाडी सेविका-६ पदे-** १) करंजा , २) कोंढरी क्र.-१, ३) नागाव क्र.-२, ४) फुंडे, ५) सारडे अ.द.पाटील परिसर, ६) सारडे मराठी शाळा परिसर.

**टिप :- अर्जाचा नमुना व अटी-शर्ती संबंधित ग्रामपंचायत / प्रा.शाळा/अंगणवाडी केंद्र /एबाबिसेयो प्रकल्प उरण स्तरावर प्रसिद्ध करण्यात आलेला असून त्याच्या प्रती उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.**

कार्यालयीन पत्ता :- बाल विकास प्रकल्प अधिकारी
एकात्मिक बाल विकास सेवा योजना उरण कार्यालय
पशुवैद्यकीय दवाखाना इमारत दुसरा माळा
H.P. गॅस चार फाटाचे मागे उरण
दिनांक : ०१/०७/ २०२१

**सही/-**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**प्रकल्प उरण.**



## जाहिरनामा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, पनवेल-२**
**अंगणवाडी सेविका, मीनी अंगणवाडी सेविका,**
**अंगणवाडी मदतनीस पद भरती सन २०२०-२१**

जा.क्र.एबाविसयो/आस्था/अंसेभ/१९३/२०२१ जाहिरात क्र.२/२०२१

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१२/प्र.क्र.४२९/का.६ दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१६/प्र.क्र.२३०/का.६/दिनांक २२ सप्टेंबर,२०१६. शा.नि.क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.२२३/का.०६/दिनांक १७/०१/२०२०, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१९/प्र.क्र.३०५/का.०६/दिनांक १७/०१/२०२०, परिपत्रक क्रमांक.एबाविसेयो/का-७/अंगणवाडी पद भरती/२०२०/३६७, दिनांक ३०/०१/२०२० परिपत्रक क्र.एबाविसेयो/नमुंबई/का-७/२२१/२०२०/दिनांक २०/०५/२०२१, मा.आयुक्त, एबाविसेयो यांचे जा.क्र.एबाविसेयो/अंगणवाडी/का-४ अंसेम/२०२१/२६७८ दिनांक २३.०६.२०२१ अन्वये व, मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. एबाविसेयो/का-७/अंगणवाडी/२७०२/२०२०-२१, दि.२५.०६.२०२१ मान्यता मिळाल्याप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, पनवेल २ अंतर्गत **अंगणवाडी सेविकांची एकुण ८ पदे** भरावयाची आहेत. त्याकरिता संबंधित गावातीलच (ग्रामपंचायत नव्हे) ज्या गावात अंगणवाडी केंद्र आहे अशा गावातील तसेच महानगरपालिका क्षेत्रांतर्गत येणाऱ्या संबंधित वार्ड / प्रभागामधील (नगरसेवकाचा मतदार संघ) **स्थानिक** महिला उमेदवारांकडुन जाहीरातीमधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडुन ऑफलाईन पदधतीने कार्यालयीन वेळेत **दिनांक ०५/०७/२०२१ ते दिनांक १६/०७/२०२१** रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी दिनांक १६/०७/२०२१ रोजी सांयकाळी ०६.१५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. जाहीरात प्रसिद्ध केल्याच्या दिनांकास उमेदवाराचे **वय २१ वर्ष ते ३२ वर्ष** इतके असावे. अंगणवाडी सेविका या पदासाठी **किमान १० वी उत्तीर्ण** असणे आवश्यक आहे.

**अंगणवाडी निहाय भरावयाचा पदांचा तपशिल**

**अंगणवाडी सेविका - ०८ पदे,** १) खैरणे १ (ग्रा.पं.खैरणे), २) भोकरपाडा (ग्रा.पं.चिपळे), ३) तामसई (मीनी अंगणवाडी) (ग्रा.पं. खैरवाडी), ४) टावरवाडी (मीनी अंगणवाडी) (ग्रा.पं.मालडुंगे), ५) धानसर, (म.न.पा.प्रभाग १), ६) तुर्भे (म.न.पा.प्रभाग १), ७) पालेखुर्द १ (म.न.पा. प्रभाग २), ८) वाघ्राची वाडी (मीनी अंगणवाडी) (म.न.पा.प्रभाग ९),

**टिप:- अर्जाचा नमुना व अटी/शर्ती ग्रामपंचायत / वार्ड /प्रभाग याठिकाणी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. प्रत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये/वार्ड / प्रभाग या ठिकाणी उपलब्ध असून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प, पनवेल २ कार्यालयात देखिल उपलब्ध आहेत. अधिक माहीतीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय पनवेल २,पंचायत समिती आवार, डि.एड. कॉलेज जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि, रायगड
दि.०५/०७/२०२१

**सही/-**
**(चेतन प्र. गायकवाड)**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना**
**प्रकल्प, पनवेल-२**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## आवरे येथील रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे मुख्याध्यापक सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । उरण**

शिक्षण महर्षी स्व. बाळासाहेब म्हात्रे यांच्या ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेच्या रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.गायकवाड सेवानिवृत्ती कार्यक्रम कोरोना संकटामुळे उपशिक्षक सुरेश भेंडे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व त्यांच्या सौभाग्यवती कल्पना गायकवाड, गोवठणे विकास मंचचे अध्यक्ष तथा पालक प्रतिनिधी सुनिल वर्तक, सामाजिक कार्यकर्ते अनिल घरत व सुकन्या कु. आकांक्षा अशा मोजक्याच मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडण्यात आला.

यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक , शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या मनोगतातून मुख्याध्यापक एस.बी. गायकवाड सोबत त्यांच्या कठोर पण कर्तव्यदक्ष वृत्तीचा,त्यांनी सर्व स्तरावर केलेल्या मदतीचा उल्लेख करून सरांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करून पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. गायकवाड आणि स्व.बाळासाहेब म्हात्रे यांच्या आठवणींना उजाळा देतांना शिक्षक भावनाविवश झाले.तर पालक प्रतिनिधी सुनिल वर्तक यांनी स्व. बाळासाहेबांनी आपल्या संस्थेत पारखून घेतलेले आणि संघटन कौशल्य असलेले खणखणीत नाणे असल्याचे गायकवाड यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले.

## गडब येथील विज पुरवठा पुर्ववत सुरु

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील गडब येथील मेन लाईनची केबल तुटल्याने खंडीत झालेला विज पुरवठा तिन दिवसानंतर पुर्ववत सुरु झाल्याने नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

गडब येथील मेन लाईनची केबल येथील येथील मुबई-गोवा महामार्गावरील हनुमान मंदिराचे जवळील नाल्यातुन टाकण्यात आली आहे. ही केबल तुटल्याने विज पुरवठा खंडीत झाल्याने येथील नागरिकांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागले.रात्रीच्या वेळी डांसाचा प्रादुर्भाव, व वृध्द व आजारी नागरिकांसह लहान मुलांना वातावरणात वाढलेले उष्णतामान यांचा त्रास पंखे बंद असल्याने सहन करावा लागला. दोन दिवस विजवितरण कंपणीचे कर्मचारी, ठेकेदारांचे कामगार व गावातील ग्रामस्थांनी खंडीत विज पुरवठा सुरु करण्याचा प्रयन्त केला पंरतु त्यांना यश आले नाही, दोन ठिकाणी केबल खराब झाल्याने अखेर तिस-या दिवशी नविन केबल आणावी लागली, ही केबल टाकण्यासाठी गावातील ग्रामस्थानी विजवितरण कंपणीच्या कर्मचा-यांना व ठेकेदारांचे कामगारांना सहकार्य करुन रात्री उशीरा खंडीत विज पुरवठा पुर्ववत सुरु करण्यात आला. येथील केबल पुर्ण बदलुन नविन टाकण्यात यावी अशी मागणी यावेळी ग्रामस्थानी विजवितरण कंपणीकडे केली. गडब येथील मेन लाईनच्या केबलची पाहाणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल विज अभियंता उमाकांत सपकाळे यांनी सांगितले.

# माथेरान मध्ये वृक्षारोपण म्हणजे एकप्रकारे दिखावाच ! वाळवीमुळे असंख्य झाडे मरणावस्थेत

**दै.रायगड नगरी । माथेरान**

वृक्षवल्ली आम्हा सोयरे ही संतांची काव्यरचना खऱ्या अर्थाने पिढ्यानपिढ्या वास्तव्यातील परिस्थिती वर भाष्य निर्माण करणारी आहे. परंतु आजकाल सर्वत्रच वृक्षारोपण म्हणजे एकप्रकारचा दिखावा आणि पोकळ प्रसिद्धी दाखवण्याचे अन वनराई बद्दल किती आस्था, आपुलकी, प्रेम असल्याचा भास अभिप्रेत करण्यासाठी केलेली एक केविलवाणी धडपड प्रत्यक्षात दिसून येत आहे.



समुद्रसपाटीपासून जवळपास ९२७ मीटर उंचीवर विराजमान झालेले सह्याद्रीच्या कुशीत वसलेले एक टुमदार आणि थंड हवेचे प्रदूषण मुक्त पर्यटनस्थळ म्हणून माथेरानचे नाव जगप्रसिद्ध आहे. विविध प्रकारची लाखो झाडे अनेक वर्षांपासून मोठया डौलाने दिमाखात उभी असून याच माध्यमातून हवेत गारवा आणि शुद्ध हवेतील ऑक्सिजन निस्वार्थापणाने ही वृक्षवल्ली सर्वानाच भरभरून देत आहेत.यातील अनेक झाडे ही जुनाट झालेली असून बहुतांश ठिकाणी या झाडांना वाळवी लागल्याने ती मरणावस्थेत दिसत आहेत. त्यामुळेच एखाद्या अतिवृष्टीमुळे या झाडांची आपसूकच मोठया प्रमाणावर पडझड झालेली दरवर्षी इथे पहावयास मिळते. एक रोप मोठे व्हायला त्याचा व्यास अवाढव्य होण्यासाठी खूप वर्षे लागतात.वनखात्याच्या अधिकारी वर्गाला या सर्व बाबींचे निराकरण करणे शक्य नसल्याने यासाठी वनसंरक्षक समितीची स्थापना याठिकाणी करण्यात आलेली आहे.या समितीचे मुख्य कार्य हे केवळ वनांचे संरक्षण करणे हाच एकमेव उद्देश आहे. परंतु याकडे आजवर स्थापित केलेल्या कुठल्याही वनसंरक्षक समितीच्या

पदाधिका-यांनी ही बाब गांभीर्याने विच-ारात घेतलेली दिसून येत नाही.यातील कुणीही सदस्यांच्या गटाने एखाद्या जंगल भागाला आवर्जून भेट दिल्याचे ऐकिवात सुध्दा नाही. जवळपास वीस सदस्यांची ही समिती कार्यरत असून महिला सदस्यांची संख्या अधिक प्रमाणात आहे. यातील क्वचितच कुणी एखाद्या मिटींगला उपस्थिती दर्शवित असेल. मीटिंग झालेली देखील बहुतेक सदस्यांना ठाऊक नसते. या समितीने काय महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. वृक्षारोपण करण्यासाठी किती रोपे मागवली आ-हेत त्यासाठी किती लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे याबाबत अनेकांना कल्पना सुध्दा नसते. विशेष म्हणजे नगरपरिषदेत ज्या पक्षाची सत्ता स्थापन झालेली आहे त्यातील कार्यकर्त्यांना ह्या समितीवर सदस्य म्हणून नेमणूक करण्यात येते. परंतु सत्ताधारी शिवसेनेने पक्षातील कार्यकर्त्यांना ज्यांनी सत्ता स्थापन करण्यासाठी मेहनत घेतली होती त्यांनाच वगळून आपापले नातेवाईक आणि अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांना यामध्ये सामावून घेतलेले आहे. दरवर्षी वृक्षारोपणाच्या नावाखाली लाखो रुपयांचा अक्षरशः चुराडा केला जात आहे. कारण एकदा का वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला की त्याकडे कुणीही ढुंकूनही पहात नाही ही इथली वस्तुस्थिती आहे. वृक्षारोपणाचा दिखावा न करता ज्या ज्या ठिकाणी ही रोपे लावण्यात आलेली आहेत त्याठिकाणी हरित लतावेलींचा देखावा पर्यटकांच्या नजरेत कशाप्रकारे साठेल अन इकडे पर्यटकांची संख्या दरवर्षी वाढून सर्वानाच रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे

वनसंरक्षक समितीचे मुख्य काम हे वनराईचे सुयोग्यप्रकारे संगोपन करणे ज्या झाडांना वाळवी लागून ती केव्हाही उन्मळून पडू शकतात त्यांची देखभाल त्या झाडांवर औषधाची फवारणी करून त्यांचे आयुष्य कसे वाढेल यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणे हाच एकमेव उद्देश आहे. गर्द वनराई मुळेच इथे पर्यटकांची रेलचेल सुरू असते. पॉईंट भागात सुध्दा आवश्यक ठिकाणी विकास कामे पूर्ण करणे गरजेचे आहे. परंतु वनराईच्या देखभालीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून केवळ पॉईंट भागात संरक्षक रेलिंग बांधण्यात ही समिती धन्यता मानत आहे.माथेरानच्या प्रवेशद्वारापासून ज्या ज्या झाडांना घोडे बांधल्यामुळे जी झाडे सुकून गेली आहेत त्याठिकाणी झाडांना काटेरी जाळ्या लावून जेणेकरून कुणीही झाडांना घोडे बांधणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक बनले आहे. दरवर्षी शेकडो झाडे वादळी वाऱ्याने उन्मळून पडतात. घोड्यांच्या मलमुत्रामुळे सुध्दा बहुतांश झाडी दरवेळी लोप पावत चालली आहे त्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने एकतरी झाड जगविलेच पाहिजे तरच हे माथ्यावरचे रान आपले माथेरान अबाधित राहू शकते. त्यासाठी महत्त्वाची जबाबदारी ही वनसंरक्षक समितीची असून गावाच्या हितावह व्यापक दृष्टिकोन ठेऊन कामे मार्गी लावणे यासाठी सचोटीने प्रयत्न केल्यास निश्चितच हे सुप्रसिद्ध पर्यटनस्थळ नावारूपाला येऊ शकते. असे जेष्ठ नागरिकांमधून बोलले जात आहे.

# जिल्हाधिकारी निधी चौधरी रायगड यांच्या हस्ते वृक्षारोपण संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण अंतर्गत १४ शासकीय व १० अनुदानित आश्रमशाळांमध्ये जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या मार्गदर्शनानुसार वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आश्रमशाळांमध्ये वृक्षारोपणासाठी जिल्हा कृषी अधीक्षक श्रीमती उज्वला बाणख-ले यांच्याकडून बोगनवेल, डुरांटा, कोकम, आवळा, जांभुळ, सिताफळ, करंज व फुलझाडे अशी विविध एकूण १ हजार ७०० रोपे मोफत उपलब्ध करुन देण्यात आली. सर्व रोपे प्रकल्प कार्यालय, पेण मार्फत सर्व आदिवासी आश्रमशाळांना दि. २९ जून रोजी देण्यात आली.



जिल्हाधिकारी निधी चौधरी या शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, वरवणे ता. पेण जि. रायगड येथे वृक्षारोपण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून आवर्जून उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते बोगनवेलचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण च्या प्रकल्प अधिकारी श्रीमती शशिकला अहिरराव, पेण उपविभागीय अधिकारी विठ्ठल इनामदार, नायब तहसिलदार सुनिल जाधव आदि अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. उपस्थित अधिकाऱ्यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले. जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांनी शालेय इमारत, वसतिगृह इमारत व परिसराची पाहणी करुन अमूल्य मार्गदर्शक सूचना दिल्या. तसेच त्यांनी उपस्थितांकडून शैक्षणिक व सोयी सुविधांबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकारी श्रीमती निधी चौधरी यांच्या या आश्रमशाळा भेटीमुळे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळाली.

# धोकादायक मॅनहोलला झाकणे बसविण्याची नागरिकांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर ३५ मधून शीघ्र कृती दलाकडे आणि पेठ गावाकडे जाणार्या, पांडवमार्ग चौकातील मॅनहोलची झाकणे तुटली आहे. त्यामुळे वाहनचालकांसह पादचार्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे. सिडको प्रशास-नाने त्वरित नवीन झाकणे बसवावीत अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

पांडवमार्ग चौकामधून शीघ्र कृती दलाकडे जाणार्या रस्त्यावरील वळणावर मॅनह-ोलचे झाकण तुटले आहे. हा रस्ता कायम वर्दळीचा आहे. त्यामुळे पादचारी आणि वाहन चालकांच्या जिवाला धोका आहे. अपघात होवू नये म्हणून वाहतूक पोलिसांनी या ठिकाणी प्लॅस्टीकचे बॅरिकेट लावले आहे. चौकातून पुढे गेल्यास बस थांबा लगत काही गटावरील झाकणे तुटली आहेत. सदर रस्त्यावरील पथदिवेही गेल्या काही महिन्यापासून बंद आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवाशांची गैरसोय होते.

याबाबत वाहतूक पोलीस म्हणाले की, मॅनहोलचे तुटलेले झाकण अपघाताला निमंत्रण देणारे असून सिडकोच्या अधिकार्यांतनी लक्ष देणे गरजेचे आहे.

याबाबत संबंधित सिडको अधिकार्यां कडे विचारणा केली असता कर्मचारी पाठवून पाहणी केली जाईल असे सांगितले.

# सडवली येथे पोलादपूर तालुक्यातील पहिला डिजिटल बसस्टॉपचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायतीच्या हद्दीत कृषीदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमामध्ये तालुक्यातील पहिल्या डिजिटल बसस्टॉपचे शेकाप तालुकाचिटणीस व राजिमस बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड यांच्याहस्ते उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी पंचायत समितीच्या सभापती नंदाताई चांदे, गटविकास अधिकारी धनंजय जगताप, गटशिक्षणाधिकारी हंबीर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन वैभव चांदे, सरपंच ताई पवार, उपसरपंच अशोक जाधव, बापू जाधव, ग्रामसेविका त्रिशिला गंभिरे तसेच अन्य मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.




सडवली गावामध्ये ॲड.आस्वाद पाटील यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेल्या निधीतून वायफाय सुविधेसह आकर्षक आसनव्यवस्था आणि डिजिटल फलकासह डिजिटल बसस्टॉप उभारण्यात आला असून याठिकाणी गाड्यांची वाट पाहण्यासोबतच प्रवासी तसेच ग्रामस्थांना मोबाईलद्वारे वायफायसेवा उपलब्ध झाल्याने इंटरनेट हाताळणीदेखील शक्य होणार आहे, अशी माहिती यावेळी शेकाप तालुकाचिटणीस व राजिमस बँकेचे संचालक एकनाथ गायकवाड यांनी श्रीफळ वाढवून उदघाटन करताना दिली.

यावेळी पोलादपूर पंचायत समितीच्या सभापती नंदाताई चांदे यांच्याहस्ते वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला तर कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन वैभव चांदे यांच्याहस्ते वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडीसेविका, आशासेविका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरुड ग्रामीण रुग्णालयाला जीवनवर्धक साहित्य वाटप

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय जनता पक्षाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष ॲड.महेश मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली डॉक्टर डे चे औचित्य साधून जिल्हा कमिटी सदस्य, ज्येष्ठ नेते तथा सामाजिक कार्यकर्ते जनार्दन सदाशिव उर्फ आण्णा कंधारे यांच्यातर्फे मुरुडच्या ग्रामीण रुग्णालय फातिमा बेगम व लेडी कुलसूम हॉस्पिटलला जीवनवर्धक साहित्याचे वाटप करण्यात आले. भारतीय जनता पक्षाचे तालुकाउपाध्यक्ष विनोद (बाळा)भगत, संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, शहर अध्यक्ष उमेश माळी, ज्येष्ठ पत्रकार मदन हणमंते, केदार गद्रे, सुधीर पाटील, सु-नील खेऊर, किशोर म्हसकर कार्यकर्ते तसेच ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.दिव्या सोनम, डॉ.शिवाली व्हावळ, डॉ.विजय हडबे, परिचारिका व कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कोरोना जागतिक महामारीच्या पार्श्वभूमीवर मदतीचा हात आण्णा कंधारे यांच्यातर्फे ग्रामीण रुग्णालयाला वॉटरजार, सॅनिटायझर,मास्क, वाफेचे मशीन (स्टिमर्स) डॉक्टर व स्टाफसाठी देण्यात आले.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, श्री.पागोटी ततयाह (मयत), २) श्री.पागोटी अनिल वर्मा, ३) श्रीमती.पागोटी रत्ना यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत १) सौ.निलोफर शफिक शेख, २) श्री.वसीम मुबारक बागवान विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**फ्लॅट मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**फ्लॅट नं.२०१, दुसरा माळा, बिल्डींग नं.एस-१ (एस १ एस २ एस ३) टाईप, सी.एच.एस.लि., मोराज रिव्हरसाईड पार्क, तक्का, पनवेल**

सबब या जाहीर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु., वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्कहितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसाचे आत आपल्या हक्कहितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणारे यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाहीत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे विक्रीच्या कराराचे/खरेदीखताचे व हस्तांतरणाचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे व हरकती यांचा विचार करण्यात येणार नाही. सदर तक्रारी, दावे वा हरकती या रद्दबातल आहेत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दि.१/०७/२०२१

**सही/-**
**ॲड.जी.एल.ठोनगे**
**बी.ए.एलएल.बी.**
**ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई**
**१०५/१०९/३, हुजेरिया स्ट्रीट,**
**मुंबई-४००००८**
**मो.नं.९८६९१७४४६०/८८९८६३२८८१**



मे.मुजावर सो

प्रोसेस जमा रु.५०/- अर्जदारतर्फे वकील ॲड.साजिद कच्छी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज, (सिनिअर डीव्हीजन) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.५३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२३/०७/२०२१

१) श्रीमती.सुलताना फारुक दळवी वगैरे अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, कै.फारुक अब्दुल लतीफ दळवी दिनांक ०५/०८/२०१६ रोजी मु.पो.तालुका मुरुड जंजिरा येथे निधन झाले आहे. त्यांचे खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.

**अ) मौजे : पनवेल येथील सि.टी.सर्व्हे नं.२११/ए, २११/१, २११/सी ३/३ ए/१ बी, वरील अलअमीन, ए-विंग, सदनिका क्र.००१, क्षेत्र ३५४ चौ.फूट कारपेट**

**ब) तळोजा पाचनंद, नवीमुंबई, येथील सिडको हद्दीमधील से.१०, प्लॉट नं.१२१ वरील मिना अपार्टमेंट मधील सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, क्षेत्र ३८३ चौ.फूट कारपेट.**

अर्जदार हे कै.फारुक अब्दुल लतिफ दळवी यांच्या वारस हक्कासंबंधी गहाण, दान, बक्षिस, लीज, लीन, साठेकरार, तारण, कुळहक्क, खरेदी, विक्री अथवा तत्संबंधित कोणत्याही हक्काने अगर अन्य कुणासही हरकत घेण्याची असल्यास अशा संबंधित व्यक्तीने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत लेखी हरकत स्वतः अथवा वकीलामार्फत सादर कराव्यात.

सदर नोटीसीच्या मुदतीत अन्य कुणाचीही हरकत वगैरे न आल्यास व अर्जदार यांनी दिलेला पुरावा सिद्ध झाल्यास या अर्जदारांच्या लाभांत वारस दाखला दिला जाईल, याची संबंधित व्यक्तींनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१/७/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



गोडसे मॅडम

अप्रो.जमा रुपये ५०/- वकील धनंदा ज. ठाकूर वकील राजकुमार व्ही. जाधव

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्रं.८३६/२०२१
नि.नं.८
ने.ता.०४/०८/२०२१

१) श्रीमती.संध्या अनंत घरत
२) श्री.रविराज अनंत घरत
३) श्री.हर्ष अनंत घरत
वतीने अज्ञान पालनकर्ती
श्रीमती.संध्या अनंत घरत
सर्व राहणार रो.हाऊस नं.५, जिम्मी पार्क, अयप्पा मंदिर जवळ, सेक्टर १७, नेरुळ (पू.), पिन नं.४००७०६ अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ यांचे पती आणि अर्जदार क्र.२ ते ३ यांचे वडील अनंत पुंडलिक घरत यांचे निधन दि.२५/०४/२०२१ रोजी रो हाऊस नं.५, जिम्मी पार्क, अयप्पा मंदिर जवळ, सेक्टर १७, नेरुळ (पू.), पिन नं.४००७०६ येथे झाले असून सदर मयत कै.अनंत पुंडलिक घरत यांचे १/७ हिश्श्याचे हक्क, हितसंबंध व अधिकार असलेली मिळकत खालीलप्रमाणे आहे.

**संपादीत झालेल्या जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे/हिस्सा नं. | क्षेत्रफळ ए.गुंठा.आर |
|---|---|---|---|
| खारकोपर | १० | ५/१४ | १-२७-०० |

वरील मिळकतीबाबत वरील अर्जदारांनी त्यांचे नावे वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्यांचे तशी लेखी हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीस (३०) दिवसांचे आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देण्यात येईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.०१/०७/२०२१ रोजी आमच्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मे.मुजावर साहेब

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्रं.७६३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०८/२०२१

कै.गणपत महादेव कोळी मयतचे वारस
१) श्रीमती.हिराबाई गणपत कोळी
वय : ९१ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.मु.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
२) श्री.दिनकर गणपत कोळी
वय : ६३ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.केशव गणपत कोळी
वय : ६८ वर्षे, धंदा : नोकरी
रा.घर नं.४८ सी, सोनापूर गल्ली,
वरळी कोळीवाडा, वरळी प.४०००२५
४) श्री.दत्तात्रेय गणपत कोळी
वय : ४५ वर्षे, धंदा : शेती
रा.मु.पो.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड
५) श्रीमती.सुलोचना पांडुरंग कोळी
वय : ६५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै. गणपत महादेव कोळी ह्यांचे निधन दि.०९/१०/१९९४ रोजी मु.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. तसेच त्यांची आई कै.भागुबाई महादेव कोळी यांचे निधन दि.१०/०६/१९६५ रोजी मु.पो.कोंबडभुजे, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. श्रीमती.हिराबाई गणपत कोळी, वगैरे ह्यांनी कै.गणपत महादेव कोळी यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : तरघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | यु.के.नं. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| तरघर | १७७ | ७४ | २ | ०-११-६ | २.५० |
| | | ८९ | ४ | ०-२३-७ | १.०५ |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै. गणपत महादेव कोळी यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे अंदाजे ४०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्रीमती.हिराबाई गणपत कोळी, वगैरे हे कै.गणपत महादेव कोळी यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.हिराबाई गणपत कोळी, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. गणपत महादेव कोळी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.१/७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## मोबाईल शॉपमध्ये घरफोडी

**दै.रायगड नगरी । पनवेल**


एका बंद मोबाईल शॉपचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी आतमध्ये असलेले मोबाईल, घड्याळे व इतर ऐवज चोरुन नेल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे.

निखील भागवत (३७) यांच्या मोबाईल शॉपच्या दुकानाचे अज्ञात चोरट्यांनी लॉक तोडून व आतमध्ये असलेले विविध कंपनीचे मोबाईल फोन, घड्याळे व इतर ऐवज असा मिळून ४१ हजार ९०० रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेल शहरातून मुलगा बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एक १७ वर्षीय मुलगा पाण्याच्या बाटल्या आणण्यासाठी घराबाहेर पडला तो अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



अपनयन मुलाचे नाव कु. करिम अब्दुल शेख असे असून पनवेल रेल्वे स्टेशन जवळील आझाद नगर गंगाराम टॉकीजच्या बाजूला राहत्या घरात असलेल्या लोकांनी दुकानातून पाण्याच्या बाटल्या विकत घेवून ये असे त्याला सांगितले. त्यामुळे तो घराबाहेर पडला तो अद्याप घरी परतला नाही. तो अंगाने मजबूत, रंग सावळा, डोळे काळे, केस काळे बारीक, नाक सरळ असून अंगात काळ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व चॉकलेटी रंगाची जिन्स पॅन्ट घातलेली आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक दयानंद महाडेश्वर यांच्याशी संपर्क साधावा.

## तळोजा वसाहतीवर तिसऱ्या डोळ्याची नजर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा वसाहतीची वाढती लोकसंख्या तसेच वर्षअखेर मेट्रो रेल्वे सुरु होणार असल्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने नजर ठेवण्यासाठी तळोजा पोलिसांच्या वतीने फेज एक आणि दोन मध्ये दीडशे सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे या परिसरातील नागरिक समाधान व्यक्त करीत आहे.

तळोजा वसाहतीच्या लोकसंख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. डिसेंबर अखेरीस सिडकोकडून पेंधर ते सेन्ट्रल पार्क दरम्यान मेट्रो रेल्वे सुरु करण्यासाठी युध्दपातळीवर कामे सुरु आहेत. तळोजा वसाहतीत मेट्रो कार शेड, तळोजा आणि पेंधर मेट्रो स्थानक आहे. या शिवाय नर्सरी, पूर्व प्राथमिक तसेच शाळेच्या संख्येत वाढ होत आहे. तर काही बँका देखील नवीन शाखा उघडण्याच्या तयारीत आहेत. तळोजा वसाहतीच्या विकासात झपाट्याने वाढ होत असल्यामुळे चोरी, घरफोडी, महिलांची छेडछाड आदि विविध गुन्ह्यांत वाढ होत आहे. त्यामुळे वाढत्या गुन्हेगारीवर नजर ठेवण्यासाठी शहरातील कोपराकोपर्यावर सीसीटीव्ही कॅमेर्यांआची नजर असणार आहे. तळोजा वसाहत सुरक्षित असावी असा उद्देश समोर ठेवून तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक काशिनाथ चव्हाण यांच्या प्रयत्नाने जवळपास पन्नास लाख रुपये खर्च करुन रस्ते, चौक, वर्दळीचा परिसर शाळामहाविद्यालय, बँका, रेल्वे स्थानक परिसर आदि महत्वाच्या ठिकाणी दीडशे सीसीटीव्ही कॅमेरे लावले जात आहे.

### आदिवासी कातकरी बांधवांचे जबरदस्तीने स्थलांतर करणाऱ्यांवर...

# वेठबिगारी कायद्या अंतर्गत तात्काळ गुन्हे दाखल करा : विवेक पंडित

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

दुर्गम दुर्लक्षित व डोंगराळ, दऱ्या खोऱ्यासह जंगल माळरान भागात वास्तव्यास असलेल्या गरीब, दुर्बल, परावलंबी, अज्ञानी, असंघटीत व्यक्तींच्या दुबळेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध, जबरदस्तीने स्थलांतर करण्याचे प्रकारात वाढ झाली आहे. या दुर्बल घटकाला कामाचा योग्य मोबदला न देता वेठबिगारी पद्धतीने राबविले जात असून हे रोखण्यासाठी आता कठोर पावले उचलण्याची गरज आहे. आदिवासी कातकरी बांधवांचे जबरदस्तीने स्थलांतर करणाऱ्यांवर वेठबिगारी कायद्या अंतर्गत तत्काळ गुन्हे दाखल करा असे कडक निर्देश आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार विवेक पंडित यांनी प्रशासनाला दिले आहेत.

पालीत आदिवासी कातकरी समाजाच्या विविध प्रश्न व समस्यांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत त्यांनी प्रशासनाला आवश्यक सूचना वजा आदेश दिले. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यात डोंगर दऱ्या खोऱ्यात दुर्गम डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर आदिवासी कातकरी बांधव वास्तव्यास आहेत. जिल्ह्यातील विविध भागात दारिद्र्य व रोजगाराच्या पुरेशा



संधी उपलब्द नसल्याने अशा भागात स्थलांतराचे प्रमाण अधिक असल्याचे निदर्शनास आले आहे. सुधागड तालुक्यात एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात निम्मे कातकरी कुटुंबानी स्थलांतर केले आहे. पाली तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक पा-तळीवर विविध व प्रभावी उपाययोजना केल्या आहेत. येथील कुटुंबांना बयाना देणं, आगाऊ उचल देणे, व त्याबदल्यात श्रम विकत घेणे हा वेठबिगारी प्रमाणे गुन्हा आहे. लायसन्स नसेल तर सावकारी पद्धतीनुसार गुन्हा आहे, या प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने अधिक कठोर पावले उचलावीत असे आदेश विवेक पंडित यांनी यावेळी दिले. तसेच स्थलांतर रोखण्यासाठी रोजगार हमी योजना, मनरेगा अंतर्गत रोजगार उपलब्द देण्यावर भर दिला पाहिजे. स्थानिक पातळीवर आदिवासी कातकरी बांधवांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी निर्माण करून देणेबाबत यावेळी सूचित केले. स्थलांतराने कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहतात, त्यांच्या आरोग्यावर देखील विपरीत परिणाम होतो असे विवेक पंडित म्हणाले. खालापूर, सुधागड या आदिवासी बहुल तालुक्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्य करीत आहे. जिल्ह्यातील अनेक भागातील आदिवासी समाज आजही मूलभूत नागरी सेवा सोयीसुविधापासून वंचित आहे. त्यामुळे आदिवासी समाजामध्ये नाराजी व्यक्त होत असताना येथील आदिवासी समाजाची समस्या जाणून घेत राज्यमंत्री दर्जा असलेले आदिवासी क्षेत्र आढावा समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार विवेक पंडित यांनी शासकीय दौरा करीत तालुक्यातील सर्व शासकीय अधिकारी आणि आदिवासी समाजाच्या प्रमुख कार्यकर्त्यांसोबत आढावा बैठक घेत तालुक्यातील आदिवासी बांधवाच्या सर्व समस्या जाणुन घेतल्या, व प्रशासनाला आवश्यक त्या सूचना वजा आदेश दिले. याबरोबरच आदिवासी बांधवावर अन्याय व शोषण करणाऱ्यावर कडक कारवाईचे आदेश दिल्याने अनेक व्यवसायिक आणि अधिकारी वर्गाचे धाबे दणाणले आहेत. यावेळी विवेक पंडित – अध्यक्ष,आदिवासी क्षेत्र आढावा समिती (राज्यमंत्री दर्जा) आदिवासी क्षेत्र आढावा समिती अध्यक्ष राज्यमंत्री दर्जा तथा माजी आमदार विवेक पंडित, आदिवासी विकास निरिक्षक जगदीश भानुशाली, प्रकल्प अधिकारी शशीकला आहिरराव, प्रांताधिकारी डॉ.यशवंत माने, तहसीलदार दिलीप रायन्नावार, पोलीस निरीक्षक विजय तायडे, , श्रमजीवी संघटनेचे राज्य सरचिटणीस बाळाराम भोईर, रवींद्र लिमये, जिल्हाध्यक्ष हिरामण नाईक, जिल्हा उपाध्यक्ष मारुती वाघमारे, महिला जिल्हाध्यक्षा योगिता दुर्गे, हिराताई पवार, तालुकाध्यक्ष विश्वास वाघमारे, सोनी मोरे आदी प्रमुखासह शासकीय अधिकारी आणि आदिवासी समाज बांधव उपस्थित होते.

## जागतिक डॉक्टर्स डे च्या निमित्ताने शिवसेना शाखा माथेरानतर्फे डॉक्टरांचा सत्कार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या महासंकट काळात शर्थीचे प्रयत्न करून माथेरान मधील अनेक कोरोना बाधितांना जीवदान देण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची कामगिरी उल्लेखनीय असल्याचे मत विद्यमान नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी व्यक्त केले.डॉक्टर दिनानिमित्त नगरपरिषदेच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांसह उप नगराध्यक्ष आकाश चौधरी, नगरपरिषदेचे गटनेते तथा बांधकाम सभापती प्रसाद सावंत, शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी नगरसेवक शकील पटेल, राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते.

डॉक्टर दिनानिमित्त डॉ. प्रशांत यादव यांचा सत्कार शिवसेनेचे शहर प्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते शाल, पुष्प-गुच्छ आणि सन्मानपत्र देण्यात आले, डॉ. उदय तांबे यांचा सत्कार जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, माजी नगरसेवक अवधूत येरफुलले यांच्या हस्ते, डॉ. प्रांजल सिंह यांचा सत्कार नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्या हस्ते तर डॉ. सचिन वाणी यांचा सत्कार नगरसेवक शकील पटेल आणि महिला आघाडीच्या संगीता जांभळे यांच्या हस्ते करण्यात आला.



कोरोनाच्या महाभयंकर कठीण समयी दिवसरात्र मेहनत घेऊन येथील नगरपरिषदेच्या दवाखान्यातील वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत यादव, डॉ. उदय तांबे, डॉ. प्रांजल सिंह त्याचप्रमाणे डॉ. सचिन वाणी यांनी कोरोना रुग्णांची सेवा करण्यामध्ये जराही कुचराई केलेली नाही. ज्या रुग्णांची ऑक्सिजन पातळी खूपच खालावली होती त्यांनाही धीर देत उत्तम प्रकारे औषधोपचार करून ठणठणीत बरे केलेले आहे. याप्रसंगी माजी नगरसेवक प्रकाश सुतार, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, यांनी या सर्व वैद्यकीय अधिकारी वर्गाने केलेल्या उत्तम कामगिरी बाबतीत आपले अनमोल विचार व्यक्त केले. शिवसेनेच्या वतीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमात माजी नगरसेवक संदीप शिंदे, अनंत शेलार, मनोहर घावरे, वसंत कदम, सिताराम शिंदे, दीपक जाधव, मनोहर रांजणे,सूर्यकांत कारंडे, सागर पाटील, समीर पन्हाळकर, यांसह असंख्य शिवसैनिक मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## जनभावनांचा खदखदतोय लाव्हा महागाईला वेळीच लगाम लावा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

पेट्रोल १०५ रुपये झाले तर गॅस सिलेंडर २५ ने वधारला आहे, विजेचे दर पेटले आहेत प्रचंड वाढली महागाई आणि वाढत जाणार महागाई, वरुन डोक्यावर कोरोनाची टांगती तल-वार, हाताला काम नाही कोरोनाच्या भितीने घरात बसुन कोण खायला घालणार ? शिक्षणाचे तिन तेरा, दोन वर्षात अवस्था वाईट. बेकारी वाढली सर्वच उद्योग व्यवसाय ठप्प, इकड आड आणि तिकड विहीर! अशी बिकट अवस्था झाली आहे. मायबाप सरकार काय करते आहे ? कोणालाही काही पडलेल नाही. अशातच जनभावनांचा खदखदतोय लाव्हा लोक आक्रोशाने म्हणताहेत महागाईला वेळीच लगाम लावा




निवडणुकीच्या वेळी अच्छे दिनच स्वप्न दाखविल जात. देशातील काळा पैसा स्विस बँकेतुन परत आणुन म्हणे, देशात खुशहाली येणार होती. या सगळ्या गप्पा गोष्टी नंतर म्हणे जुमला ठरल्या, आता कुठेही आंदोलन नाही, वाच्चता नाही सगळ कस बिनबोभाट सुरु आहे.

सव्वाशे करोडहून अधिक लोकसंख्येच्या लोकशाही देशात कोणीही या महागाई विषयी भाष्य करीत नाही. सार कस आलबेल सुरु आहे. याहुन आणखी काय हवयं, यालाच तर अच्छेदीन म्हणतात! असच लोक आता नैराश्यातून बोलतात. अशीच महागाई वाढत राहीली तर सगळीकडे अराजकता माजेल अशा दबक्या आवाजात सर्वच कानाकोपऱ्यात प्रतिक्रीया धुमसतायत. महागाई मुळे लोकभावना दबलेल्या लाव्ह्या सारखी संतप्त झाली आहे.

# कर्जत प्रेस क्लबच्या वतीने शेतकऱ्यांचा शेताच्या बांधावर सन्मान

**प्रगत शेतकरी अशोक पाटील, काशिनाथ काळण आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित**



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत प्रेस क्लबच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही १ जुलै कृषीदिनानिमित्त कर्जत तालुक्यातील दोन शेतकऱ्यांची निवड करून त्यांचा शेताच्या बांधवार जावून सन्मान करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवर तसेच कर्जत प्रेस क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

दरवर्षी रायगड प्रेस क्लबच्या माध्यमातून जिल्हयातील प्रगत आणि शेतीनिष्ठ शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्या शेताचा बांधावर जाऊन करण्यात येतो. जिल्हयाचे प्रेस क्लबचे युनिट सन्मानासाठी निवडलेल्या शेतकऱ्यांचा सन्मान त्यांच्याच शेताच्या बांधावर जाऊन करतात. परंतु कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता यावर्षी भालीवडी येथे कमी संख्येत हा कार्यक्रम घेण्यात आला. भालिवडी येथील विहान कृषी पर्यटन केंद्र येथे गुरुवार दि. १ जुलै २०२१ रोजी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कर्जत प्रेस क्लबच्या वतीने कर्जत तालुक्यातील प्रगत आणि शेतीनिष्ठ शेतकर्यांआचा सन्मान भालीवडी येथे मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन करण्यात आला.

यावर्षी भालीवडी येथील प्रगत शेतकरी अशोक नारायण पाटील आणि पिंपलोळी येथील प्रगत शेतकरी काशिनाथ भाऊ काळण या दोन शेतकर्यां ना कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आदर्श आदर्श शेकतरी २०२१ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कृषीविद्यापीठ विस्तार शास्त्रज्ञा रवींद्र मर्दाने, मंडळ कृषी अधिकारी विजय वानखेडे, कृषी सहाय्यक कल्याणी कोरपड, भालीवडी ग्रामपंचायतीचे सरपंच, प्रभाकर गंगावणे, सुदाम भोईर, कर्जत प्रेस क्लबचे सल्लागार, विजय मांडे, रायगड प्रेस क्लबचे खजिनदार दर्वेश पालकर, कर्जत प्रेस क्लबचे उपाध्यक्ष विलास श्रीखंडे, कार्याध्यक्ष कांता हाबळे, सदस्य जयवंत हाबळे, भूषण प्रधान, गणेश पवार, गणेश मते, विकास मिरगणे आदी यावेळी उपस्थित होते. तर यावेळी कृषीविद्यापीठ विस्तार शास्त्रज्ञ रवींद्र मर्दाने, मंडळ कृषी अधिकारी विजय वानखेडे, कृषी सहाय्यक कल्याणी कोरपड यांनी शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देत विशेष मार्गदर्शन केले.

## टँकर चालकाला घेतले पोलिसांनी ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये अपघात करून पसार झालेल्या टँकर चालकाला तळोजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील साई हॉस्पिटलसमोरील रस्त्यावर टँकर क्र.एमएच-४३-वाय-१५९६ वरील चालक पिंटू रामउजागीर यादव (४०) याने त्याच्या ताब्यातील टँकर हयगयीने व अविचाराने चालवून टँकर पुढे चाललेल्या मोटार सायकलला धडक देवून केलेल्या अपघातात मोतीराम दुर्गे यांचे गंभीररित्या जखमी होवून निधन झाले होते. याप्रकरणी टँकर चालक पिंटू यादव याच्या विरोधात कारवाई करून त्याला ताब्यात घेतले आहे.

## खुल्या शाळेच्या संकल्पनेमुळे विद्यार्थ्यांना अर्धवट शिक्षण पूर्ण करण्याची संधी

**शासनाच्या महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाचा उपक्रम**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरची परिस्थिती हालाकीची असलेल्या अनेकांना आपल्या परिस्थितीमुळे पूर्ण शिक्षण घेता आले नाही. अपूर्ण शिक्षणामुळे अनेक जणांना ईच्छा नसताना सफाई कामगारासारखी कामे करावी लागतात. अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणाची ईच्छा असल्यास मोफत शिक्षणाची व्यवस्था मोफत खुल्या शाळेद्वारे करण्यात आली आहे. या योजनेला सब पढे आगे बढे अशी टॅग लाईन खुल्या शाळेची संकल्पना मांडलेल्या डॉ जी के डोंगरगावकर यांनी दिली आहे.

६ वी ते ९ वी मध्ये नापास झालेल्यांना दहावीत पास व्हावे यासाठी निराधारांना निशुक्ल आणि अन्य विद्यार्थ्यांना माफक फी मध्ये सर्व विषय शिकण्याची सोय रायगड खुली शाळेमध्ये करण्यात आली असल्याचे या शाळेचे संचालक डॉ. जी के. डोंगरगावकर यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे जाहीर केले आहे. आर्थिक परिस्थिती बेताची गणित इंग्रजी विषयाची भीती आदींसह गावात पाचवीनंतर शिक्षणाची सोया नाही. या कारणामुळे खेड्यापाड्यातील, आदिवासी वाडीतील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे एका सर्व्हे मध्ये देखील समोर आले आहे.लहान वयात मुलींचे लग्न या आणि अन्य कारणामुळे अर्धवट शिक्षण झालेल्या मुलांच्या उज्वल भवितव्यासाठी १० वी बोर्डाची परीक्षा पास होण्यासाठी विशेष वर्ग शिक्षण तज्ञाच्या मार्फत घेतले जाणार असल्याची माहिती डॉ डोंगरगावकरांनी दिली. यामध्ये इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, कनडा, तेलगू, माध्यमात स्वतंत्रपणे शिकवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

एकीकडे खाजगी शिकवणी घेणारे भरमसाठ फी आकारतात त्यामुळे आर्थिक गरिबांना शिक्षणापासून मुकावे लागते म्हणून निराधारांना मोफत व अन्य विद्यार्थ्यांना माफक फी मध्ये ही सोया करण्यात आली असल्याचे डॉ डोंगरगावकर म्हणाले. शासनाच्या मगाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे अंतर्गत विद्यार्थ्यांना या शिक्षणाचा लाभ घेता येणार असल्याचे डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी सांगितले.

## राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेचे दोन लाभार्थ्यांना धनादेश वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

राष्ट्रीय कुटुंब अर्थ सहाय्य योजनेंतर्गत उरण तालुक्यातील उरण नगरपरिषद हद्दीतील भवरा कातकरवाडी येथे राहणाऱ्या चीनी बाई महादू कातकरी व देवकी विठ्ठल कातकरी यांना सदर योजनेंतर्गत प्रत्येकी २० हजार रुपये अनुदान धनादेश उरण चे तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली काल १ जुलै २०२१रोजी तहसील कार्यालयात महसूल नायब तहसिलदार नरेश पेढवी यांच्याहस्ते देण्यात आला.

या वेळी महसूल विभाग अव्वल कारकून गणेश गोरेगावकर, नगरसेवक नंदु लांबे आदी उपस्थित होते. उरण नगर परिषदेचे नगरसेवक नंदु लांबे यांनी लाभार्थांना अनुदान मिळण्यासाठी प्रयत्न केले. ज्या व्यक्तीचे नाव दारिद्र रेषेखाली आहे. त्या व्यक्तीच्या कुटुंबातील कर्ता व्यक्तीचे अपघाती किंवा नैसगिक मृत्यु झाला असेल तर अशा व्यक्तीच्या वयाच्या ६०



वर्षा पर्यंत वारसांना २० हजार रुपये अनुदान दिले जाते. त्यांनी ३ वर्षाच्या आत अर्ज केला पाहिजे. असे तहसिल कार्यालयातून सांगण्यात आले.

## बेडरिडन रुग्णांचे कोरोना लसीकरण करण्याची डॉ. सुरेखा मोहोकर यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आजारामुळे अथवा वृद्धावस्थेमुळे अंथरुणाला खिळलेल्या बेडरिडन रुग्णांचे कोरोना लसीकरण करण्याची मागणी नगरसेविका डॉक्टर सुरेखा मोहोकर यांनी केली आहे. कोविड१९ रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील अधिकाधिक नागरिकांचे लसीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. वय वर्ष अठरा ते ४४ व ४५ वर्षे वयावरील नागरिकांचे लसीकरण मोहीम चालू असताना असे काही नागरिक आहेत की जे असाध्य आजारामुळे अथवा वृद्धावस्थेमुळे अंथरुणाला खिळलेले आहेत. अशा नागरिकांना लसीकरण केंद्रावर येणे अथवा आणणे शक्य नाही. अशा रुग्णांना व नागरिकांना covid-19 चा प्रादुर्भाव होण्याची शक्यता देखील अधिक प्रमाणात आहे. अशा नागरिकांचे व रुग्णांचे लसीकरण करण्याकरता पनवेल महानगर पालिके मार्फत विशेष मोहीम राबवण्याची मागणी नगरसेविका डॉक्टर सुरेखा विलास मोहोकर यांनी पनवेलचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.